स्थापत्य अभियांत्रिकी खाते

क्र.राप/बांधकाम/वास्तू-व्यासं/ 1824

सादर

दि. 25/०४/२०२५.

विषय : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध जागांवर सार्वजनिक -खाजगी -सहभागा अंतर्गत (PPP) प्रकल्प राबविणे .......**जाहीर ई-निविदा प्रसारीत करण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

संदर्भ : १.दि..२९.०५.२०२३ रोजीच्या निविदा सुचना क्र.०६

२.मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी ई- ६६२०४९/परि-१ दि. ११/१०/२०२३ रोजी दिलेली मंजूरी.

३.या खात्याची टिप्पणी क्र.राप/स्थाअ/व्यासं/४९५१, दि.०७/१२/२०२३.

४.या खात्याची टिप्पणी क्र.राप/स्थाअ/व्यासं/५५८, दि.०९/०२/२०२४

५.या खात्याची टिप्पणी क्र.राप/बांधकाम/वास्तू-व्यासं/२९९३, दि.१०/०७/२०२४

६.या खात्याची टिप्पणी क्र.राप/बांधकाम/वास्तू-व्यासं/३६४२, दि.१६/०८/२०२४

७.शासन निर्णय क्रमांक एसटीसी-०४२२/प्र.क्र.१५५/परि-१, दि.०७ ऑक्टोंबर २०२४.

---

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध जागांवर सार्वजनिक -खाजगी -सहभागाअंतर्गत (PPP) प्रकल्प राबविणेकरीता तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे पटल (panel) तयार करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदेद्वारे १३ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या सूचीस मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये मंजूरी दिली आहे. व तसा महामंडळ ठराव क्र.२०२३:११:१७ दि. २२/११/२०२३ संचालक मंडळाने मान्य केला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून आलेल्या मागणीनुसार तथा विभाग नियंत्रक यांच्या प्राप्त प्रस्तावांनुसार पहिल्या टप्प्यासाठी ७४ ठिकाणे सार्वजनिक -खाजगी -सहभागाअंतर्गत (PPP) विकसित करणेसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर ७४ ठिकाणांना मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची उपरोक्त संदर्भ क्र.३ ते क्र.६ अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे. सदर ७४ ठिकाणांची सुची परिशिष्ट **"अ"** सोबत जोडले आहे.

संदर्भ क्र.४ या कार्यालयाची टिप्पणी अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना रु.०-५० कोटी पर्यंतच्या एकूण अंदाजितप्रकल्प खर्चाच्या २.०० % (सर्व करांसहीत परंतू वस्तु व सेवा कर वगळून) व रु.५०.०० कोटी वरील परंतू रु.२५०.०० कोटी पर्यंतच्या एकूण अंदाजित प्रकल्प खर्चाच्या १.५ % (सर्व करांसहीत परंतू वस्तु व सेवा कर वगळून) सेवाशुल्क दर निश्चित करण्यात आले आहे. तसेच कामांचे वाटप करण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात आले आहे. रु.२५०.०० कोटी वरील व महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी डिझाईन स्पर्धा घेऊन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यात येईल, असे निश्चित करण्यात आले आहे. निश्चित केलेल्या सेवाशुल्काबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्याकडून संमतीपत्र घेण्यात आले.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सदर जागेचे सर्व्हेक्षण, बाजाराची स्थिती, बाजाराची मागणी व पुरवठा इ. बाबींचा अभ्यास केला व तदनंतर विभाग नियंत्रक यांच्या प्राप्त प्रस्तावांनुसार तसेच चलनीय माहिती यावरुन प्रकल्पांची सर्वसाधारण आखणी केली आहे.

दि.२४/०७/२०२४, दि.२५/०७/२०२४ व दि.२६/०७/२०२४ रोजी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १९ प्रकल्पांचे सादरीकरण केले.

सदर बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी १९ प्रकल्प प्राथमिक दृष्टया आर्थिक व्यवहार्य असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकल्पाचे Inception Report, जागेचे सर्व्हेक्षण, बाजारचे परिक्षण (मागणी व पुरवठा),आराखडे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी तयार केले असून संदर्भ क्र. ३ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी या कार्यालयास सादर केलेले आहे. त्यानुसार दि.१२/१०/२०२४ रोजी १९ प्रकल्पांच्या जाहीर ई-निविदा सुचना प्रसारीत करण्यात आली.

शासन निर्णय क्रमांक एसटीसी-३४००/प्र.क्र.१४८/परि-१, दि.०१/०२/२००१ अन्वये रा.प.महामंडळाच्या ताब्यातील जागांचा व्यापारी तत्वावर उपयोग करणेसाठी ३० वर्ष भाडेकराराचा कालावधीस शासनाने मंजूरी दिलेली होती.

तथापि, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर उपयोग करणेसाठीच्या सुधारीत धोरणास महाराष्ट्र शासन निर्णय-गृहविभाग-क्रमांक एसटीसी-०४२२/प्र.क्र.१५५/परि-१, दि.०७ ऑक्टोंबर २०२४ अन्वये प्रकल्प व्यवहार्य होण्यासाठी भाडेपट्टा कराराचा कालावधी ३० वर्षाऐवजी ६० वर्ष करणेस शासनाने मान्यता दिली आहे. तसेच सदर शासन निर्णयास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

दि. २०/०३/२०२५ रोजी मा.मंत्री (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) प्रकल्पांबाबत बैठक पार पडली. सदर बैठकीस मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक (बांधकाम), वास्तुशास्त्रज्ञ, रा.प. महामंडळ व रा.प. पटलावरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार उपस्थित होते. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी प्रकल्पांचे सादरीकरण केले. मा.मंत्री (परिवहन) यांनी आणखी काही प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करावी तसेच आर्थिक सुसाध्यतेनुसार प्रकल्पाचे अ,ब व क असे वर्गीकरण करुन अ,ब व क साठी निविदांचे एकत्रीकरण करावे असे आदेश दिलेत.

सदर महत्त्वाच्या बदलामुळे दि.१२/१०/२०२४ रोजी प्रसारीत करण्यात आलेल्या ई-निविदा रद्द करुन बदललेल्या नियमावलीनुसार सुसाध्यता अहवाल अद्ययावत करुनच नव्याने खालील ठिकाणांसाठी फेरनिविदा प्रसारीत करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी सादर केल्यानुसार खालील प्रकल्प प्राथमिक दृष्टया आर्थिक व्यवहार्य असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकल्पाचे Inception Report, जागेचे सर्व्हेक्षण, बाजारचे परिक्षण (मागणी व पुरवठा),आराखडे यावरुन निविदा संच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी तयार केला असून निविदा संचास परवानगी मिळणेस विनंती आहे.

| पॅकेज | विभाग | ठिकाण (अ) | ठिकाण (ब) | ठिकाण (क) |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | लोणावळा बसस्थानक | तळेगांव आगार | कोरेगांव भिमा बसस्थानक |
| २ | अकोला | वाशिम बसस्थानक | रिसोड बसस्थानक | मंगळूरपीर बसस्थानक |
| ३ | यवतमाळ | पुसद बसस्थानक | दारव्हा बसस्थानक | नेर बसस्थानक |
| ४ | लातूर | लातूर मध्यवर्ती बसस्थानक | रेणापूर बसस्थानक | नळेगांव बसस्थानक |
| | | | | |

मा. महाव्यवस्थापक (वाहतूक) व मा. वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी रा. प. मध्यवर्ती कार्यालय यांना विनंती करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पांच्या जाहीर ई-निविदा रा. प.प्रचलीत कार्यपद्धती राबविण्यास आपले अभिप्राय व जाहीर ई-निविदा राबविण्याच्या खर्चास यथायोग्य दुरुस्तीसह मंजूरी देण्यात यावी.

मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना विनंती करण्यात येते की वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन उपरोक्त प्रकल्पांच्या जाहीर ई-निविदा रा. प.प्रचलीत कार्यपद्धती राबविण्यास व जाहीर ई-निविदा राबविण्याच्या खर्चास यथायोग्य दुरुस्तीसह मंजूरी देण्यात यावी

मा. अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रस्ताव व अभिप्रायांचे अवलोकन करुन ई - निविदा प्रक्रिया राबविण्यास आवश्यक खर्चासह मंजूरी मिळावी.

**सहाय्यक स्थावर व्यवस्थापक**
(महेश सावंत)